मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 30 ऑक्टोबर 2025 | पान- 1

# निगडी प्राधिकरणात हरित सेतूच्या कामात वृक्षाचा बळी

## महानगरपालिकेने पंचनामा करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा; नागरिकांची मागणी

**पिंपरी | प्रतिनीधी**

निगडी प्राधिकरणातील सेक्टर नंबर 26, आकुर्डी रेल्वे स्टेशन आणि बीएसएनएल ऑफिस शेजारी सुरू असलेल्या हरित सेतूच्या कामादरम्यान निष्काळजीपणामुळे मोठा प्रकार घडला. रात्री काम सुरू असताना रस्त्याच्या बाजूला असलेले झाड कोसळले आणि रस्त्यावर अडथळा निर्माण झाला. या झाडामुळे संपूर्ण रस्ता रात्रीपासून बंद राहिला आणि रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.



घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेचे उद्यान विभाग आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. त्यांनी झाड हटवून रस्ता सुरू केला, परंतु नागरिकांनी निष्काळजीपणे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई होईल की नाही याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे.

या घटनेनंतर माजी नगरसेवक अमित गावडे, महापालिका वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य नंदकुमार सातुर्डेकर, तसेच अतुल भोंडवे, निलेश शिंदे, विलास कुटे, विजय नाईक, धनंजय कदम, संदीप गोरे आणि स्थानिक नागरिक सकाळी घटनास्थळी उपस्थित राहिले. त्यांनी संबंधितांवर पंचनामा करून गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली.

नागरिकांचा आरोप आहे की, हरित सेतूच्या कामात सुरक्षा आणि पर्यावरणीय नियमांचे पालन झाले नाही. झाड कोसळल्याने केवळ वाहनचालकांना अडचण निर्माण झाली नाही, तर परिसरातील रहिवाशांना भीती आणि धोका देखील निर्माण झाला.

महानगरपालिकेने याबाबत तातडीची कारवाई करण्याची गरज असून, निष्काळजीपणे काम करणाऱ्या कंत्राटदारांवर आणि प्राधिकरण कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार की नाही, हा प्रश्न नागरिकांसाठी महत्वाचा ठरतो आहे.

या घटनेमुळे निगडी प्राधिकरणाच्या हरित सेतू प्रकल्पाची कार्यपद्धती, पर्यावरणीय सुरक्षा उपाय आणि कामगारांचे प्रशिक्षण या बाबींवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नागरिकांचा आग्रह आहे की, भविष्यात अशा घटनांचा पुनरावृत्ती होऊ नये आणि हरित प्रकल्पाच्या नावाखाली पर्यावरणाची हानी होऊ नये.

# नकुल भोइर खून प्रकरणी पत्नीचा प्रियकरही अटकेत

## 1 नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी; चिंचवडगावातील नकुल भोईर हत्या प्रकरणाचा उलगडा

**पिंपरी | प्रतिनीधी**

चिंचवड येथील नकुल भोईर यांच्या खुनप्रकरणात अटक करण्यात आलेल्या महिला आरोपी चैताली भोईर हिचा प्रियकर सिद्धार्थ दिपक पवार (वय २१, रा. बालाजी अपार्टमेंट, लिंकरोड, चिंचवड) याचा या खुनात सहभाग असल्याचे तपासात उघड झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी त्याला अटक करून न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने त्या दोघांनाही १ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

नकुल आनंदा भोईर (वय ४०, रा. माणिक कॉलनी, चिंचवड) यांचा खून त्यांची पत्नी चैत्राली हिने आपण एकटीने केल्याची माहिती तिनेच पोलिसांना फोन करून दिली. त्यानुसार पोलिसांनी तिला अटक केली. मात्र या प्रकरणात आणखी कोणीतरी सहभागी असावे, अशी शंका पोलिसांना होती. त्यानुसार पोलिसांनी तिचा प्रियकर सिद्धार्थ पवार याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. मात्र त्या दोघांनीही पोलिसांना काहीच माहिती दिली नाही. अखेर पोलिसांनी विविध फंडे वापरून आरोपी गुन्ह्याची उकल केली.

आरोपी सिद्धार्थ पवार हिचे आरोपीशी अनैतिक संबंध होते. या संबंधाच्या कारणावरून नकुल भोईर आणि पत्नी चैत्राली भोईर यांच्यात वादविवाह होत होते. आपल्या अनैतिक संबंधाच्या आड नकुल भोईर येत असल्याने त्या दोघांनीही नकुलचा काटा काढण्याचे ठरविले. त्यातच चैत्राली हिने अनेकांकडून कर्ज घेतल्याची माहितीही नकुल यांना समजली. त्या कारणावरून चैत्राली व नकुल यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. यावेळी नकुलने पत्नीला मारहाण केली. आपल्या प्रियसीला मारहाण झाल्याने सिद्धार्थ याचा राग अनावर झाला आणि दोघांनी संगनमताने ओढणीच्या साह्याने नकुलचा गळा दाबून खून केल्याचे उघड झाले.



चैत्राली हिने आपणच नकुल याचा गळा आवळला असल्याचे पोलिसांना सांगितले. मात्र तपासात हे कृत्य चैत्राली आणि सिद्धार्थ या दोघांनी केल्याचे निष्पन्न झाले. ज्या ओढणीने नकुल यांचा गळा आवळला ती ओढणी सिद्धार्थ हा जाळून टाकणार होता. कारण त्या ओढणीला नकुल याचा घाम होता. मात्र चैत्राली हिने दुसरीच ओढणी पोलिसांना दाखविली. ज्या ओढणीने खून केला ती ओढणी लपवून ठेवली. आता तीच ओढणी जप्त करण्यासाठी चैत्राली हिला पोलीस कोठडी सुनावली.

आरोपी सिद्धार्थ आणि चैत्राली यांचे प्रेमसंबंध होते. ते कोणकोणत्या लॉजवर गेले याचा तपास करायचा असल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले. मात्र हे कागदी पुरावे असल्याचे त्यासाठी आरोपी सिद्धार्थ याच्या पोलीस कोठडीची गरज नाही. तसेच पोलीस चौकशीसाठी आरोपीला वारंवार पोलीस ठाण्यात बोलवत असल्याने पोलिसांना सर्व माहिती आहे. त्यामुळे पोलीस कोठडीची गरज नसल्याचे आरोपीचे वकील ॲड. सुनील कडूसकर यांनी सांगितले. तर आरोपी सिद्धार्थ याच्या रक्ताचे नमुने घ्यायचे असल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले.

### त्या मध्यस्थाच्या नावाची चर्चा

**» आरोपी चैत्राली ही पोलिसांना तपासात मदत करीत नव्हती. त्यावेळी एका मध्यस्थाने चैत्रालीची भेट घेतली. त्या मध्यस्थाने चैत्राली हिला पोलिसांना सर्व खर सांगण्यास सांगितले. तू सिद्धार्थला जरी वाचविले तरी तू तुरूंगातून बाहेर आल्यावर तो तुला स्विकारेल का, असा सवालही त्या मध्यस्थाने केला. याचा सकारात्मक परिणाम चैत्राली हिच्यावर झाला आणि तिने तपासात पोलिसांना सहकार्य करू लागली. तो मध्यस्थ निवृत्त पोलीस असल्याचे समजते.**

# महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

## मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका, पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मान्यता दिली व शहरात सुरू असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.

या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दृकश्राव्य माध्यमातून सहभाग घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत प्रभाग क्र. ३ चऱ्होली अंतर्गत सैनिक कॉलनी, सेव्हन हिल्स कॉलनी परिसरात विद्युत विषयक कामे करणे, पुणे–आळंदी रस्त्यापासून चऱ्होली–लोहगाव हद्दीपर्यंत विकास आराखड्यातील ९० मीटर रस्त्यावरील उर्वरित विद्युत विषयक कामे करणे, फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ९, ११, १२ व १३ मधील औष्णिक धुरीकरणासाठी तीन चाकी चार रिक्षा टेम्पो वाहन इंधनासह प्रतिदिन भाड्याने घेणे, कमी खर्चास मान्यता देणे, महापालिकेच्या नर्सरीत शोभिवंत रोपे तयार करून देखभाल करणे, ई क्षेत्रीय कार्यालयाकडील अंदाजपत्रकातील सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकातील चालू विकासकामांच्या तरतुदींमध्ये वाढ व घट करणे, क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २, ८ व ९ मधील पाणीपुरवठा ट्रेचेसचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे तसेच पेव्हिंग ब्लॉकची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे, प्रभाग क्र. २१ मधील अभिमन्यू चौक ते म्हाडा प्रकल्पापर्यंत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे कामी मूळ सल्लागाराकडून नव्याने करारनामा करणे, महानगरपालिकेच्या आर.ई.एफ. फॉर लोकल एरिया प्लॅन करिता सल्लागार नेमणे, पुणे ग्रँड चॅलेंज टूर (PGCT) अंतर्गत विनोदे वस्ती चौक–डी.वाय. पाटील कॉलेज आकुर्डी येथे पायाभूत सुविधा करणे, अ क्षेत्रीय कार्यालय परिसरातील शौचालय देखभाल, दुरुस्ती व साफसफाई कामाकरिता नवी दिशा या योजनेंतर्गत महिला बचत गटांना देण्यात आलेल्या स्वच्छता कामासाठी लहान जेटिंग मशीन खरेदी करणे, वैशालीताई काळभोर महिला बचत गट यांच्या सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या देखभाल व दुरुस्ती कामकाजास मुदतवाढ देणे, प्रभाग क्र. ९ मधील आरक्षण क्र. ६६ (पीएमपीएमएल म.रा.वि.वि. कं.लि.) यांस सुरक्षा ठेव व इतर बाबींसाठी रक्कम अदा करणे, मे. रामचंद्र इंटरप्रायझेस यांचे औष्णिक धुरीकरणासाठी तीन चाकी चारचाकी वाहन इंधनासह प्रतिदिन भाड्याने घेणे, ह प्रभागांतर्गत सन २०२३-२४ करिता पिंपरी चिंचवड हद्दीबाहेर आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा (शेवाळेवाडी) कामाच्या सुधारित वाढीव खर्चास मान्यता देणे, महापालिकेच्या विविध विभागांच्या संगणक प्रणालींच्या देखभाल व दुरुस्ती कामाकरिता मुदतवाढ देणे, यासह विविध विषयांना मान्यता देण्यात आली.

याशिवाय स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांच्याकडील महापालिकेच्या रहाटणी सर्वे नं. ९६, लांडेवाडी, दिघी, चऱ्होली, बोपखेल, कृष्णानगर से.२२, पाटीलनगर, जाधववाडी से.१०, गवळी माथा, सांगवी गावठाण, सांगवी पीडब्ल्यूडी, सांगवी स.नं. ८४, पिंपळे गुरव, दापोडी, थेरगाव गावठाण, थेरगाव स.नं. ९, थेरगाव लक्ष्मणनगर, काळाखडक वाकड, काळाखडक बुस्टर व पुनावळे येथील पंपहाऊसचे चालन करण्याच्या सुधारित खर्चास मान्यता देणे, प्रभाग क्र. २५ मधील वाकड येथील आरक्षण क्र. ४/२३ मध्ये शाळेचे ग्राउंड डेव्हलपमेंट, फर्निचर व आवश्यकतेनुसार स्थापत्यविषयक कामे करण्याच्या तरतुदींमध्ये वाढ/घट करण्यास मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी मान्यता दिली.

# पिंपळे सौदागरमध्ये आयएफएससी आशियाई क्लाइंबिंग चॅम्पियनशिप स्पर्धा

## 1 नोव्हेंबर ते 4 नोव्हेंबर याकाळात आयोजन; 13 देशांतील 200 युवा खेळाडूंचा सहभाग



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका, इंडियन माउंटेनिअरिंग फाउंडेशन (आयएमएफ) आणि महाराष्ट्र स्पोर्ट क्लाइंबिंग असोसिएशन (एमएससीए) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रात प्रथमच आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १ नोव्हेंबर ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पिंपळे सौदागर येथील योगा पार्कमधील अत्याधुनिक स्पोर्ट क्लाइंबिंग कॉम्प्लेक्स येथे होणार आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने देण्यात आली.

आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत १३ देशांतील सुमारे २०० खेळाडू सहभागी होणार असून, स्पीड क्लाइंबिंग, लीड क्लाइंबिंग आणि बोल्डरिंग या तीन थरारक प्रकारांमध्ये १३ आणि १५ वयोगटातील मुले-मुली आपले कौशल्य प्रदर्शित करतील. ही स्पर्धा प्रत्येक भिंतीवरील चढाई ही केवळ वेग आणि कौशल्याचीच नाही, तर मानसिक एकाग्रतेची आणि धैर्याचीही परीक्षा ठरणार आहे.

स्पर्धेचे परीक्षण आयएफएससी व आयएमएफ कडून नियुक्त आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय दर्जाचे स्पर्धाधिकारी करणार असल्यामुळे स्पर्धेतील सर्व निकष जागतिक दर्जाचे राहतील.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मिशनच्या सहकार्याने उभारलेल्या अत्याधुनिक केंद्रात ही स्पर्धा पार पडणार असून हे केंद्र सध्या देशातील सर्वाधिक प्रगत क्रीडा सुविधांपैकी एक मानले जाते. अलीकडेच ऑक्टोबर २०२५ मध्ये पार पडलेल्या २९ व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लाइंबिंग चॅम्पियनशिपने या केंद्राची गुणवत्ता आणि एमएससीएच्या स्वयंसेवकांची तयारी सिद्ध केली आहे. या अनुभवावर आधारित, आशियाई चॅम्पियनशिपचे आयोजन अधिक दर्जेदार होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे शहरासाठी अभिमानाची बाब आहे. या स्पर्धेमुळे तरुण खेळाडूंना जागतिक दर्जाच्या खेळपट्टीवर आपले कौशल्य दाखविण्याची उत्तम संधी मिळणार आहे. नागरिकांनीही या स्पर्धेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना एक अद्वितीय क्रीडा अनुभव मिळणार आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये साहस, शिस्त आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. महापालिका क्रीडा पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यास कटिबद्ध आहे, आणि ही स्पर्धा त्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.
>
> **- पंकज पाटील, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# शहरातील वाहतूक कोंडीचं खापर रिक्षांवर!

## पुण्यात रिक्षा परवान्यांवर मर्यादा आणण्याची पालिका आणि पोलिसांची मागणी



> “शहरातील रिक्षांची संख्या दीड लाखांच्या आसपास आहे. पोलिसांकडून ही बाब निर्दशनास आणून देण्यात आली. तसेच त्यावर नियंत्रण असणे आवश्यक असल्याची चर्चाही झाली. त्यानुसार शासनाकडे याबाबत पत्र पाठविण्यात येणार असून खुल्या परवाना धोरणाचा विचार करण्याची मागणी त्यात केली जाणार आहे.”
>
> - नवल किशोर राम, महापालिका आयुक्त

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात परवाने खुले केल्याने रिक्षांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. या रिक्षा रस्त्यावर, चौकात जागा मिळेल तिथे थांबतात. वर्दळीच्या रस्त्यांवर कोंडी करतात. त्यामुळे वाहतूक कोंडीला रिक्षा जबाबदार आहेत. त्यामुळे रिक्षांच्या परवान्यांवर मर्यादा आणण्यासाठी राज्यशासनाकडे विनंती करण्याचा निर्णय महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. शहरातील वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी महापालिका आयुक्तांनी घेतलेल्या आढावा बैठकीत पोलीस आणि महापालिकेने एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले.

त्यानंतर या कोंडीची जबाबदारी वाढत्या रिक्षांवर फोडण्यात आली.गेल्या काही वर्षांत शहरातील रिक्षांची संख्या दीड लाखांच्या जवळ गेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर मर्यादा आणली नाहीतर कोंडी फुटणार नाही असा निष्कर्ष बैठकीत काढण्यात आला.बैठकीत पोलीस शहरात चौकांमध्ये कारवाई करत नसल्याची तक्रार पालिकेच्या अधिकाऱ्यांनी केली. पोलीस चौका चौकात रस्ते अडवतात, मात्र रिक्षांवर कारवाई करत नाहीत. रिक्षा थांबे असतानाही ते तेथे थांबत नसल्याचे सांगण्यात आले.

आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, “वाहतूक सुधारण्यासाठी राबविलेल्या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. चौकांपासून काही अंतरावर ‘नो पार्किंग’ झोन, अतिक्रमणमुक्त रस्ते आणि रस्त्यांच्या कडेला उभ्या राहणाऱ्या वाहनांवर कारवाई यामुळे वाहतुकीची गती वाढली आहे. मात्र, शहरातील वाहनसंख्येतील वाढ ही गंभीर समस्या बनली आहे.”

ते म्हणाले की, “पुण्यात मेट्रोचा विस्तार होत असून पीएमपीएमएलच्या ताफ्यातही नव्या बसगाड्यांची भर पडत आहे. सार्वजनिक वाहतुकीच्या वाढीसह खाजगी वाहनांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यातच गेल्या काही वर्षांपासून ऑटो रिक्षांच्या परवान्यांवरील निर्बंध उठविल्याने रिक्षांची संख्या लाखोंच्या घरात पोहोचली आहे. परवाने खुले राहिल्यास रिक्षाचालकांना व्यवसाय मिळणे कठीण होईल, तसेच रस्त्यांवरील गर्दी अधिक वाढेल.”

यावेळी पोलीस प्रशासनानेही रिक्षांचा मुद्दा मांडला. पूर्वी रिक्षा परवान्यांना मर्यादा होती. त्यामुळे, रिक्षांची चौकात वर्दळही कमी होती. त्यांच्यावर कारवाईस मर्यादा येते. त्यामुळे कोंडी होते. तसेच, रिक्षाच्या थांब्यांची फेररचना आवश्यक असून त्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने थांबे निश्चित करावे असे सुचविण्यात आले. तसेच, रिक्षाचे परवाने वाढतच राहिल्यास कोंडी वाढतच जाणार असल्याची भिती व्यक्त करण्य़ात आली. त्यानंतर रिक्षा परवान्यांबाबत फेरविचार करावा तसेच त्यावर मर्यादा आणावी यासाठी शासनाला पत्र पाठविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. तसेच ही जबाबदारी महापालिकेवर देण्यात आली.

### संयुक्त समिती नेमणार..

» बैठकीत रिक्षांच्या अधिकृत थांब्याबाबतही चर्चा झाली. त्यात, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. यावेळी थांब्यांबाबत महापालिकेसही सहभागी करून घ्यावे अशी चर्चा झाली. त्यानुसार, महापालिकेचा पथ विभाग, प्रकल्प विभाग, वाहतूक पोलीस तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली जाणार आहे. त्यात, किती थांबे असावेत, रस्त्यांवर अडथळा ठरणारे कोणते थांबे स्थलांतरीत करावे, याबाबत चर्चा करून सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे.

# ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ

## पुण्यात ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही केवळ नागरिकांसाठीच नव्हे, तर पोलीस प्रशासनासाठीही चिंतेचा विषय ठरली आहे.




> भारत अजूनही डिजिटल साक्षरतेच्या बाबतीत मागे आहे. याच कारणांमुळे आपण सहज बळी पडतो. लोभ हे स्कॅमरचे मोठे हत्यार आहे. स्वतःची वैयक्तिक माहिती गुप्त ठेवणे हाच सर्वोत्तम बचाव आहे.
>
> - रोहन न्यायाधीश, सायबर तज्ज्ञ

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या दीड वर्षात पुण्यात ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्ये झालेली झपाट्याने वाढ ही केवळ नागरिकांसाठीच नव्हे, तर पोलीस प्रशासनासाठीही चिंतेचा विषय ठरली आहे. बनावट ट्रेडिंग ॲप्स आणि सायबर एक्स्टॉर्शनसारख्या प्रकारांमुळे सर्वसामान्य माणूस भयभीत आणि अस्वस्थ झाला आहे. तर दुसरीकडे अशा घटनांवर नियंत्रण आणण्याच्या दबावाखाली पोलीस यंत्रणा काम करत आहे. अशा प्रकारचे कॉल उचलू नका, असे आवाहन पोलिसांनी पुणेकरांना केले आहे.

“सध्या पुण्यात सर्वाधिक आढळणाऱ्या सायबर गुन्ह्यांमध्ये शेअर ट्रेडिंग आणि फॉरेक्स फसवणूक, टेलिग्रामवरील टास्क फ्रॉड हे प्रमुख तीन प्रकार आहेत,” अशी माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख यांनी ‘सीविक मिरर’ला दिली. “सायबर फसवणुकीच्या घटनांत खरोखरच झपाट्याने वाढ झाली आहे,” असे त्यांनी कबूल केले.

ही समस्या किती मोठ्या प्रमाणावर आहे हे आकडे सांगतात. पोलीस उपायुक्त (आर्थिक शाखा संचालन) विवेक मसाळ यांच्या माहितीनुसार, जानेवारी २०२४ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत तब्बल ६०० सायबर गुन्हे नोंदवले गेले आहेत. अनेकदा स्कॅमर चोरीचा पैसा परदेशी खात्यांमध्ये किंवा क्रिप्टोकरन्सीमध्ये रूपांतरित करतात, त्यामुळे रक्कम परत मिळवणे जवळजवळ अशक्य होते. “एकदा पैसे क्रिप्टो नेटवर्कमध्ये गेले की त्यांचा माग काढणे आणि ते परत मिळवणे फार अवघड होते,” असे मसाळ यांनी स्पष्ट केले

या काळात एकूण ५६३ प्रकरणे नोंदवली गेली असून ती पुण्याच्या डिजिटल असुरक्षिततेचे भयावह चित्र दाखवतात. यामध्ये सर्वाधिक म्हणजे १९३ प्रकरणे शेअर ट्रेडिंग आणि फॉरेक्स फसवणुकीची होती. त्यानंतर ४५ ‘डिजिटल अरेस्ट’ प्रकार आणि २० टास्क फ्रॉड प्रकरणे होती, जी मुख्यतः तरुणांना लक्ष्य करत होती. उर्वरित ३०५ प्रकरणांमध्ये युपीआय फसवणुका, डेटा लीक आणि गेमिंग फ्रॉडचा समावेश होता. म्हणजेच डिजिटल जगातील प्रत्येक कोपरा धोक्याने व्यापलेला आहे.

सायबर तज्ज्ञ रोहन न्यायाधीश म्हणाले, “हे स्कॅमर काही हौशी नाहीत. ते अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरतात, काटेकोर नियोजन आणि प्रचंड प्रमाणावर एकाच वेळी अनेकांना लक्ष्य करण्याची क्षमता ठेवतात. सायबर गुन्हे आता एका व्यवस्थित उद्योगाइतके संघटित झाले आहेत.”

# पुरंदर तालुक्यात पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांचे वारे

## आरक्षणाची सोडत जाहीर होताच इच्छुक उमेदवारांनी प्रचार, गाठीभेटी, मजबूत संघटन बांधणी आणि मतदार संपर्क यावर भर

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांची चाहूल लागली असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आरक्षणाची सोडत जाहीर होताच इच्छुक उमेदवारांनी प्रचार, गाठीभेटी, मजबूत संघटन बांधणी आणि मतदार संपर्क यावर भर देण्यास सुरुवात केली आहे. यंदाच्या निवडणुकीत तालुक्यातील 8 पंचायत समिती सदस्य आणि 4 जिल्हा परिषद सदस्य निवडले जाणार आहेत.

यामध्ये पंचायत समितीच्या सभापती पदाची सोडत प्रथम जाहीर करण्यात आली असून ते पद ओबीसी आरक्षणासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांमध्ये उत्सुकता वाढली आहे. पंचायत समिती गणांमध्ये ओबीसी आरक्षण मिळाले आहे, तेथील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पुरंदर तालुक्यात मोठ्या राजकीय घडामोडी देखील सुरू आहेत. माजी आमदार संजय जगताप यांनी काँग्रेस सोडून भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने भाजपाची ताकद वाढली असली तरी त्यांचे स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवणे ही मोठी कसोटी ठरणार आहे. दुसरीकडे, पुरंदरचे आमदार विजय शिवतारे हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाशी युती करणार असल्याची चर्चा सुरू आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी प्राथमिक चर्चा झाल्याचीही माहिती समोर आली आहे. त्यामुळे तालुक्यात तिरंगी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिल्हा परिषद क्षेत्रीय समीकरणे बेलसर – माळशिरस जिल्हा परिषद गटावर अनेक वर्षे माजी सदस्य सुदामराव इंगळे यांचे प्राबल्य राहिले आहे. तर दिवे – गराडे गटात माजी मंत्री दादासाहेब जाधवराव यांचा प्रभाव अनेक वर्ष राहिला आहे. या गटातील काही गावे पुरंदर विमानतळ प्रकल्पात येत असल्याने भूसंपादनामुळे मतदार असंतोष वाढू शकतो. याचा कोणत्या उमेदवाराला फटका बसेल किंवा फायदा मिळेल? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

या सर्व घडामोडींमध्ये स्थानिक स्तरावर गटबाजी, पक्षांतर, नवे चेहरे आणि जुन्या नेतृत्त्वाचा प्रभाव असे विविध राजकीय प्रयोग दिसत आहेत. विमानतळ प्रकल्प, स्थानिक विकास कामे, महिलांचे आरक्षण, मागास प्रवर्गातील प्रतिनिधित्व, आणि मोठ्या नेत्यांचे राजकीय निर्णय यांचा या निवडणुकीवर मोठा परिणाम होणार आहे.




### पंचायत समिती गण आरक्षण व इच्छुक उमेदवार

- बेलसर (सर्वसाधारण)- सुनीता केलते, योगेश कामथे, राजेंद्र भोसले, धीरज जगताप, कैलास जगताप, ॲड बाबासाहेब पिलाणे, निलेश कृष्णा जगताप.
- माळशिरस (सर्वसाधारण)- पंढरीनाथ सोनवणे, संभाजी काळाणे, महादेव शेंडकर, आरूण यादव, महादेव बोरावके.
- दिवे (ओबीसी)- अमित झेंडे, ॲड. नितीन कुंजीर, सुरज गदादे, अमोल कामठे.
- गराडे (सर्वसाधारण स्त्री)- अर्चना कटके, सुषमा कटके, दिव्या जगदाळे.
- नीरा (एससी महिला)- मोनिका गायकवाड, हेमलता जगदाळे
- कोळविहीरे (सर्वसाधारण स्त्री) – भारती मस्के, अंजना भोर, सोनाली कणसे, ज्योती भुजबळ, सारिका कुदळे
- वीर (सर्वसाधारण)- ऋतुजा धुमाळ, समीर जाधव, छाया यादव

### जिल्हा परिषद गट आरक्षण व प्रमुख इच्छुक

- बेलसर – माळशिरस (सर्वसाधारण) – दत्ता झुरंगे, गौरव कोलते, रमेश इंगळे, माऊली यादव, कैलास कामथे
- दिवे – गराडे (सर्वसाधारण महिला)- ॲड. गौरी कुंजीर, ज्योती झेंडे, संगीता काळे,
- नीरा – कोळविहीरे (ओबीसी महिला)- सानिका अजिंक्य टेकवडे, डॉ. प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे, तेजश्री काकडे, सम्राधनी सचिन लांबाते.
- वीर – भिवडी (सर्वसाधारण)- ममता लांडे शिवतारे, पुष्कराज जाधव, हरिभाऊ लोळे, दिलीप यादव, राहुल गायकवाड.

# आंबेगाव तालुक्यात उभारणार बाबासाहेबांचे भव्य स्मारक आणि संविधान भवन

## माजी मंत्री दिलीप वळसे पाटलांची मोठी घोषणा, घोडेगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या मेळाव्यात त्यांनी हे आश्वासन दिले

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, स्मारक, संविधान भवन, सामाजिक न्यायाची वसतिगृहे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) स्पर्धा परीक्षा केंद्र उभारल्यानंतरच मला माझी राजकीय कारकीर्द पूर्ण केल्यासारखे वाटेल, असा विश्वास माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केला. घोडेगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या मेळाव्यात त्यांनी हे आश्वासन दिले. या मेळाव्यास सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष गौतमराव खरात यांच्या नेतृत्वाखाली हजारो आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात आंबेडकरी जनतेने घोडेगाव शहरातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची ढोल-ताशांच्या गजरात काढलेल्या भव्य मिरवणुकीने झाली. त्यानंतर वनमाला मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करण्यात आले. राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वाचन करून पाहुण्यांचे स्वागत झाले. स्मारक समितीचे सचिव प्रकाश सोनवणे यांनी प्रास्ताविक केले.सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष गौतमराव खरात यांनी यावेळी समाजाच्या प्रलंबित मागण्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा स्मारक तसेच संविधान भवनाची मागणी केली. माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांनीही अनेक वर्षांची ही मागणी वळसे पाटलांनी पूर्ण करावी, असा आग्रह धरला.

यावेळी माजी खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील, भीमाशंकर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे, जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष विष्णु हिंगे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती निलेश थोरात, माजी सभापती प्रकाश घोलप, माजी सनदी अधिकारी प्रकाश वाघमारे, प्रकाश सोनवणे, गौतम रोकडे, रवी फाले, रमाकांत जाधव, खंडू थोरात, एकनाथ वाव्हळ, मनोज थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.



### त्रिसूत्रीनुसार समाजाने एकसंघ राहावे

वळसे पाटील म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या त्रिसूत्रीनुसार समाजाने एकसंघ राहावे. "तुमच्या सर्व मागण्या पूर्ण करण्याची माझी जबाबदारी आहे," असे खात्रीशीर आश्वासन त्यांनी दिले. पुढील काळात हे सर्व प्रकल्प उभारून तालुक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जिवंत ठेवण्याचे काम माझ्या हातून केले जाईल, तेव्हाच माझी राजकीय कारकीर्द पूर्ण होईल, असे ते म्हणाले.